# लीलावती रुग्णालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**मुंबई,** (वा.) लीलावती हॉस्पिटल्स आणि मेनाबेन हेल्पिंग हँड् यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी गरजू रुग्णांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचा २५० रुग्णांनी लाभ घेतला असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. तपासणीनंतर गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

शिबिरादरम्यान, ऑस्टियोपोरोसिस आणि ऑस्टियोआर्थरायटिस तसेच दमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) ग्रस्त रूग्णांची फोर्स्ड ऑसिलेशन टेक्निक (एफओटी) वापरून स्पायरोमेट्री आणि बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) चाचणीद्वारे तपासणी करण्यात आली.



## आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी मदत

डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई म्हणाले की, दमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) ग्रस्त रुग्णांना औषधे आणि इनहेलरसह मोफत उपचार दिले जातात. मेनाबेन हेल्पिंग हँड् उपक्रमाच्या माध्यमातून गरजूंना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी रुग्णालय सातत्याने प्रयत्न करत आहेत.